# एका कुटुंबाने आपल्या घरात येशूची उपासना केली

पुढीलपैकी कोणतेही शैक्षणिक कार्यक्रम मुलांसाठी निवडावेत.

**प्रार्थना:** “प्रिय प्रभू, विश्वासणाऱ्यांना त्यांच्या घरी लोकांना जमा करून त्यांना येशूविषयी सांगण्यास आणि तुझी उपासना करण्यास साहाय्य कर.”

मोठ्या मुलाने किंवा शिक्षकांनी प्रे. कृ. 16:22-36 मधून फिलिप्पै येथील तुरूंग अधिकाऱ्याचा कथावृत्तांत वाचून दाखवा किंवा सांगा. यावरून एखादे कुटुंब आपल्या घरात देवाची उपासना कशी करते हे पहायला मिळते.



कथावृत्तांत सांगून झाल्यावर पुढील प्रश्न विचारा. *(प्रत्येक प्रश्नापुढे उत्तरे दिली आहेत.)*

- अंमलदाराने पौल व सीला ह्यांना कशी वागणूक दिली? *(वचने 23-24)*
- पौल व सीला मध्यरात्री तुरूंगात काय करीत होते? *(वचन 25)*
- बंदिशाळेचा नायक स्वत:ला का ठार करणार होता? *(वचने 26-27)*
- बंदिशाळेच्या नायकाचे व त्याच्या कुटुंबाचे तारण कसे झाले? *(वचन 31)*
- बंदिशाळेचा नायक व त्याच्या कुटुंबाचा रात्रीच्या कोणत्या वेळी बाप्तिस्मा झाला? *(वचने 25 व 32-34)*

बंदिशाळेचा नायक व त्याचे कुटुंब ह्या कथावृत्तांताचे नाट्यीकरण करा.

- मुलांना छोटीशी नाटिका सादर करता यावी यासाठी उपासनेच्या पुढाऱ्यांशी बोलून व्यवस्था करा.
- मुलांकडून नाटिकेची तयारी करून घ्या. तुम्ही सर्व भूमिका केल्याच पाहिजेत असे नाही.
- मोठ्या मुलांनी लहान मुलांना नाटिकेच्या तयारीसाठी मदत करावी.
- मोठ्या मुलांनी किंवा प्रौढांनी पुढील भूमिका कराव्यात:

  **पौल**

  **बंदिशाळेचा नायक:** दोन साखळ्या म्हणून दोर घ्या. तसेच तरवारीसारखे काही हातात ठेवा.

  **निवेदक:** कथावृत्तांताचा सारांश तयार करा. टेबलाच्या एका कडेला दगडांची किंवा पुस्तकांची रास करा.
- लहान मुलांनी सीला, अमलदार कैदी आणि बंदिशाळेच्या नायकाचे कुटुंब.

**निवेदक:** प्रे. कृ. 16:22-28 मधून कथावृत्तांताचा पहिला भाग सांगून मग म्हणा, “अंमलदार काय म्हणतो ते ऐका.”

**अंमलदार:** "बंदिशाळेच्या नायकाला म्हणतो," पौल व सीला ह्यांना अटक करून तुरूंगात टाका. त्यांना फटके मारा. आणि त्यांच्यावर बारिक लक्ष ठेवा.

**बंदिशाळेच नायक:** त्यांचे पाय दोऱ्याने बांधून ठेवा (गाठ मारू नका). माग म्हणा, "मी त्यांना अगदी आतल्या खोलीत बांधून ठेवीन आणि अगदी जीवापाड त्यांच्यावर पहारा ठेवीन."

**पौल व सीला:** टेबलाखाली बसून गीते गा.

**बंदिशाळेचा नायक:** "बापरे भूंकप होतोय!" (टेबल हालवा म्हणजे त्यावरील दगड वा पुस्तके खाली पडतील)

**पौल व सीला:** दोर तोडून उभे राहा

**कैदी:** "अरे आपण सुटलो! दारे तर उघडी दिसत आहेत!"

**बंदिशाळेचा नायक:** तरवार उपसून म्हणा, "हे काय झाले! कैदी सुटले वाटत आता मला स्वत:चा घात केलाच पाहिजे!"

**पौल:** मोठ्याने ओरडा, "थांबा साहेब! स्वत:ला अपाय करून घेऊ नका. आम्ही सर्व येथेच आहोत!"

**निवेदक:** प्रे. कृ. 16:29–33 मधून कथावृत्तांताचा दुसरा भाग सांगा आणि मग म्हणा, "बंदिशाळेचा नायक काय म्हणतो ते ऐका."

**बंदिशाळेचा नायक:** "दिवा आणा बरे! मला पौल व सीला कोठे आहेत ते पहायचे आहे." मग पौल व सीला यांच्यासमोर गुडघे टेकून बसा आणि मोठ्याने विचारा, "महाराज माझे तारण व्हावे म्हणून मला काय केले पाहिजे?"

**पौल:** "प्रभु येशूवर विश्वास ठेव म्हणजे तुझे व तुझ्या घराण्याचे तारण होईल."

**बंदिशाळेच्या नायकाचे कुटुंब:** "आम्हालाही येशूवर विश्वास ठेवायचा आहे."

**बंदिशाळेचा नायक:** "प्रथम मी तुमच्या जखमा धुऊन त्यांना औषध लावतो मग रात्री आम्ही सर्व बाप्तिस्मा घेतो."

**निवेदक:** प्रे. कृ. 16:34–36 मधून कथावृत्तांताचा तिसरा भाग सांगून मग म्हणा, "बंदिशाळेचा नायक पौल व सीला ह्यांना काय म्हणतो ते ऐका."

**बंदिशाळेचा नायक:** "मला खूप आनंद झाला आहे कारण माझ्या संपूर्ण कुटुंबाने येशूवर विश्वास ठेवला आणि बाप्तिस्मा घेतला. चला माझ्या घरी जाऊन आपण जेवू या."

**अंमलदार:** टेबलावर टकटक करा आणि म्हणा, "सुप्रभात, पौल व सीला ह्यांना सोडून द्या."

**बंदिशाळेचा नायक:** "दादा, माझ्या कुटुंबाला येशूचे शुभवर्तमान सांगितले म्हणून धन्यवाद देतो. शांतीने जा!"

**निवेदक किंवा मोठे मूल:** नाटिका संपल्यावर मदत करणाऱ्या प्रत्येकाचे आभार माना,

प्रश्न मुलांनी हे नाट्यीकरण मोठ्या माणसांसमोर सादर केले असेल तर त्यांना वरील तुम्ही उत्तरे दिलेले प्रश्न मोठ्या माणसांना विचारण्यास सांगा.

**मुलांना विचारा:** आपल्या घरांमध्ये आपल्याला कशा प्रकारे देवाची उपासना व सेवा करता येते त्याची उदाहरणे सांगा.

तुमच्या गावातील सर्वसामान्यपणे सर्वत्र आढळणाऱ्या घराचे चित्र काढा. मुलांनी हे चित्र काढून उपासनेच्या वेळी मोठ्या माणसांना दाखवावे आणि आपल्याला घरात किंवा इतरत्र देवाची उपासना करता येते हे स्पष्ट करून सांगा.



**पाठ करा योहान 4:24**

**कविता** तीन मुलांना स्तोत्र 136:1-6 मधून प्रत्येकी दोन वचने म्हणायला सांगा. प्रत्येक वचन म्हणून झाल्यावर गटातील लोकांनी “कारण त्याची दया सनातन आहे” हे वाक्य सुरावर म्हणावे.

मोठ्या मुलांनी घरांमध्ये उपासनेसाठी जमा होणे या विषयावर कविता वा गाणी लिहावीत.

**प्रार्थना** “प्रिय प्रभू, आम्हाला कोठेही आणि केव्हाही तुझी उपासना करता येते याबद्दल तुझे उपकार मानतो, संख्येने कमी असलो तरी बिघडत नाही, आमची सर्व कुटुंबे तू स्वत:कडे आणलीस याबद्दल तुला आम्ही धन्यवाद देतो. आम्ही मनापासून अंत:करणपूर्वक तुझी उपासना करावी यासाठी आमचे साहाय्य कर.”

***तुम्ही मुलांना शिकवीत असाल आणि अद्याप पौल तीमथ्य अभ्यास मुलांच्या शिक्षकांसाठीची मार्गदर्शकतत्वे A0b हा अभ्यास वाचला नसेल तर कृपा करून आता वाचा.***

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net